महाराष्ट्र पोलीस

**पोलीस अधीक्षक, पालघर यांचे कार्यालय**

मध्यवर्ती प्रशासकीय इमारत संकुल, मोरेकुरण रोड, पालघर, बोईसर, रोड, कोळगांव (प.) जिल्हा – पालघर. दुरध्वनी – ०२५२५-२५११००

E-mail sp.palghar@mahapolice.gov.in


जा.क्र.पोअ/पालघर/आस्था-१/पदो/ पोहवा ते सपोफौ/ ५६९ /२०२४ दिनांक :- ३१ /१२/२०२४

विषय :- पोलीस अंमलदार यांना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आलेल्या पदोन्नतीबाबत..

संदर्भ :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.३५१/कार्यासन-१२, दि.०१/०८/२०११

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि. ०७/०५/२०२१

-------ooo-------

आ दे श :-

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र. बीसीसी /२०१८/प्र. क्र. ३६६/ १६-ब, दि.०७/०५/२०२१ मधील निर्देशानुसार खालील नमुद पोलीस हवालदार यांना दि.२५/०५/२००४ रोजीच्या सेवाज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ मधील निर्णयाच्या अधिन राहुन या आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस हवालदार यांना दि. २५/०५/२००४ रोजीच्या सेवाज्येष्ठतेच्या स्थितीनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाचे अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या पदावर कार्यभार ग्रहण केल्या दिनांकापासुन पदोन्नती देण्यात येत आहे.

खालील नमुद **पोलीस** हवालदार यांना वेतन स्तर एस-१० मधील रु.२९२००-रु.९२३०० या वेतनमानावर **सहायक पोलीस उप निरीक्षक या पदावर** त्यांनी प्रत्यक्ष कार्यभार स्विकारल्या दिनांकापासुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अंमलदाराचे नांव, हुद्दा व बक्कल नंबर | नेमणुक |
|---|---|---|
| १. | मपोहवा/८९६, जागृती जयंता पाटील/रत्न केशव जाधव | उविपोअ बोईसर विभाग |
| २. | मपोहवा/३१३, समिधा संदीप चोरे | तारापुर पोलीस ठाणे |
| ३. | चापोहवा/१९८, अर्जुन हिमंतराव मघाडे | उविपोअ जव्हार विभाग/संलग्न मोपशा,पालघर |
| ४. | पोहवा/८१, महेंद्र सुभाष शर्मा | सफाळा पोलीस ठाणे |
| ५. | मपोहवा/१०३२, पुजा पुंडलिक लाखात | विक्रमगड पोलीस ठाणे |
| ६. | पोहवा/१७४, रमण शंकर सुतार | घोलवड पोलीस ठाणे |
| ७. | पोहवा/८०१, विशाल रामचंद्र चिकणे | म. सु. प. केंद्र धारोटी |
| ८. | पोहवा/१८३, शंकर तुकाराम सांगळे | घोलवड पोलीस ठाणे |

१. संबंधीत **प्रभारी अधिकारी** यांनी तात्पुरती पदोन्नती देण्यात आलेल्या वरील नमुद सर्व पोलीस अंमलदार यांना पदोन्नती दिल्याची लेखी समज देवुन, त्यांनी पदोन्नती स्विकारल्याचा दिनांक स्टेशन डायरी नोंदीसह संबंधित प्रभारी अधिकारी यांनी तात्काळ **इकडील** कार्यालयास कळवावा. तात्पुरती पदोन्नती देण्यात आलेल्या अंमलदारांपैकी जे अंमलदार सध्या रुग्णनिवेदन रजेवर/अर्जित रजेवर असतील अशा अंमलदारांनी ते कर्तव्यावर हजर झाले दिनांकापासुन त्यांना पदोन्नती देण्यात येवुन **तसे या** कार्यालयास कळवावे.

२. उपरोक्त **नमुद पोलीस** हवालदार यांना सहायक पोलीस उप निरीक्षक तसेच पोलीस नाईक यांना पोलीस हवालदार पदी **पदोन्नती ही** मा. सर्वोच्च न्यायालयात राज्य सरकारने दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचीका क्र.२८३०६/२०१७ **चे अंतिम** निर्णयाचे अधिन राहुन देण्यात येत आहे. सबब सदर तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित अंमलदार यांना **नियमीत पदोन्नतीचे**, म्हणजेच सेवाज्येष्ठतेचे कोणतेही अधिकार प्राप्त होणार नाहीत. तदुनंतर शासनाकडील सुधारीत निर्णयानुसार **याची सर्व** संबंधित पोलीस अंमलदार यांनी नोंद घ्यावी.

३. सामान्य **प्रशासन विभाग**, शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि. ०७/०५/२०२१ अन्वये निर्गमित शासन **निर्णयात काही** सुधारीत सुचना प्राप्त झाल्यास पदोन्नत झालेले सहायक पोलीस उप निरीक्षक, पोलीस हवालदार पदाची **निवडसुची** तसेच जेष्ठतासुची सुधारीत झाल्यास पदोन्नत होणाऱ्या पोलीस अंमलदार यांचे जेष्ठतासुची मधील स्थानात बदल अथवा पदावनत होणे या बाबी उद्भवु शकतात. याची नोंद घ्यावी.

४. उक्त नमुद **तात्पुरत्या** पदोन्नतीच्या आदेशाधिन असलेल्या पोलीस हवालदार, पोलीस नाईक यांचेविरुध्द आता

एखादी शिक्षा भोगत असतील, तर संबंधित प्रभारी अधिकारी यांनी त्यांना पदोन्नतीच्या पदावर कार्यभार स्विकारण्यास परवानगी न देता त्यांच्या विरुध्दच्या प्रकरणाची सविस्तर माहिती तात्काळ या कार्यालयास सादर करावी.

५. सामान्य प्रशासन विभाग, अधिसुचना असाधारण क्रमांक १०१/दि. २१/०५/२०१८ व शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४६२/कार्या-१२, दि. ०३/०५/२०१८ मधील तरतुदीनुसार पदोन्नती दिलेल्या ज्या पोलीस अंमलदार यांचे पदोन्नती आदेश दिनांकास ५० वर्षे पुर्ण झाली आहेत, असे अंमलदार वगळुन इतर पदोन्नती दिलेल्या पोलीस अंमलदार यांचेकडे विहित संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र असल्याची खात्री केल्यानंतरच त्यांना पदोन्नती स्विकारण्यास परवानगी देण्यात यावी. व त्यांचेकडे विहीत संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नसल्यास त्यांना सदर आदेश लागु होत नसल्याचे समजुन पदोन्नती स्विकारण्यास परवानगी न देता त्याप्रमाणे सत्वर अहवाल इकडील कार्यालयात सादर करावा.

६. पदोन्नती देण्यात आलेल्या वरील कोणत्याही पोलीस अंमलदार यांनी पदोन्नती स्विकारण्यास नकार दिल्यास सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र.एसआरव्ही/२०१५/प्र.क्र./३०३/का-१२, दि. १२/०९/२०१६ अन्वये त्यांना पदोन्नतीचा हक्क गमवावा लागेल. तसेच पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या निवड यादीतुन त्यांचे नाव काढुन टाकण्यात येवुन पुढील दोन वर्षी होणाऱ्या निवडसुची मध्ये त्यांचा पदोन्नतीसाठी विचार न करता तिसऱ्या वर्षीच्या निवडसुचीत पदोन्नतीसाठी पात्रता तपासण्यात येईल, याची समज संबंधित पोलीस अंमलदार यांना देण्यात यावी. पदोन्नती नाकारलेल्या पोलीस अंमलदार यांचे अर्ज घेऊन नेमणुकीचे प्रभारी अधिकारी यांनी या कार्यालयास तात्काळ सादर करावयाचे आहेत.

७. पदोन्नती अंमलदार यांनी पदोन्नती न स्विकारल्यास सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र. एसआरव्ही /५१०८७ /३१११/प्र.क्र.११/८९/१२, दि. ३०/०४/२०२१ मधील आदेशानुसार त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल. तसेच अशा अंमलदारांना कालबध्द पदोन्नती/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला/दुसरा व तीसरा लाभ मंजुर करण्यात आला असल्यास वित्त विभाग शासन शुध्दीपत्रक क्र.आप्रयो-२०१५/प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३, दि. २३/०९/२०१५ मधील तरतुदीनुसार सदरचा लाभ काढुन घेण्यात येईल. मात्र दिलेल्या लाभांची वसुली करता येणार नाही.

८. उक्त आदेशामधील या घटकातील जे अंमलदार प्रतिनियुक्तीवर अंमलदार आहेत, त्यांना मुंबई पोलीस नियमावली भाग-१ (प्रशासन) नियम ८० अन्वये नियमानुसार पदोन्नती देण्यात आली असुन, सदर पोलीस अंमलदार यांनी पदोन्नती पदाचा कार्यभार स्विकारल्याचा दिनांक या कार्यालयास विनाविलंब कळवावा. प्रतिनियुक्ती ठिकाणी पदोन्नती स्विकारलेले पद रिक्त नसल्यास व त्यांनी पदोन्नती नाकारल्यास त्याबाबतची माहिती या कार्यालयास प्रतिनियुक्तीचे घटक प्रमुखांनी सत्वर कळवावी.

९. वित्त विभाग, निर्णय क्र. १०८२/सीआर/११००(१)/एसईआर/३, दिनांक ०६/११/१९८४ अन्वये पदोन्नती स्विकारलेल्या अंमलदारांकडुन सोबत जोडण्यात आलेल्या नमुन्या वेतननिश्चिती बाबत सात दिवसांचे आत विकल्प सादर करावा. त्यानंतर त्यांची पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चिती करण्यात येईल.

१०. संबंधीत प्रभारी अधिकारी यांनी सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र.वशिअ/१२१४/प्र.क्र.५२(२)/११, दि. १६/११/२०१४ परिपत्रकात नमुद केल्याप्रमाणे पदोन्नती दिलेल्या पोलीस अंमलदार यांनी मार्च-२०२४ अखेर पावेतोची मत्ता व दायित्वाची विवरणपत्रे सादर केले असल्याबाबतची पडताळणी केल्यानंतरच पदोन्नती स्विकारण्यास परवानगी द्यावी.

**पदोन्नती मिळालेल्या सर्व पोलीस अंमलदार यांचे अभिनंदन व त्यांना शुभेच्छा देण्यात येत आहेत.**

( बाळासाहेब पाटील )
पोलीस अधीक्षक, पालघर
०८/०७/२४

प्रति,

सर्व संबंधितांना

प्रत :- उप विभागीय पोलीस अधिकारी, बोईसर, जव्हार विभाग
प्रभारी अधिकारी, पोलवड, तारापुर, सफाळा, विक्रमगड /मोटार परिवहन विभाग, पालघर
राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय पालघर

प्रत :- पोलीस अधीक्षक, महामार्ग पोलीस ठाणे परिक्षेत्र, ठाणे/महामार्ग पोलीस मदत, केंद्र, चारोटी

प्रत :- उप विभागीय पोलीस अधिकारी, बोईसर/डहाणु/पालघर/जव्हार विभाग

प्रत :- प्रमुख लिपीक लेखा शाखा/जि.पो.का. लिपीक, पालघर

प्रत :- आस्थापना शाखा — १